# कार्यालय मध्यवर्ती संशोधन केंद्र
# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

इ-मेल: directorcrs78@gmail.com

जा.क्र. म.सं.के./सामान्य/ ३०० /२०२६ दि. ११ /०६ /२०२६

## निविदा सूचना

**विषय:- मध्यवर्ती संशोधन केंद्र अंतर्गत विविध विभागाच्या प्रक्षेत्र येथील बोरवेल मधील जि.आय.पाईप तुटून गाळात फसलेले समर्सिब्ल मोटर पंप काढण्याकरिता निविदा दर (कोटेशन) बोलविणेबाबत.....**

वरील विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते कि, मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला अंतर्गत मध्यवर्ती संशोधन केंद्र अंतर्गत विविध विभागाच्या प्रक्षेत्र येथील बोरवेल मधील जि.आय.पाईप तुटून गाळात फसलेले समर्सिब्ल मोटर पंप काढण्याकरिता निविदा दर खालील प्रमाणे अटी व शर्तीस अधीन राहून मागविण्यात येत असून निविदा मसुदा/निविदेचे स्वरूप सोबत जोडण्यात आलेले आहे.

**अटी व शर्ती**

१. निविदा पत्रक/कोटेशन कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.०० ते दुपारी ५.३० या वेळेत स्वीकारल्या जातील.
२. मध्यवर्ती संशोधन केंद्र कार्यालय अंतर्गत विविध विभागाच्या प्रक्षेत्र येथील बोरवेल मधील जि.आय.पाईप तुटून गाळात फसलेले समर्सिब्ल मोटर पंप काढताना विद्यापीठाचे काही नुकसान झाल्यास विद्यापीठ प्रशासनाने ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे नुकसान भरपाई संबंधित निविदाधारक/कंत्राटदाराकडून वसूल करण्यात येईल.
३. मध्यवर्ती संशोधन केंद्र कार्यालय अंतर्गत विविध विभागाच्या प्रक्षेत्रावरील बोरवेल मधील फसलेल्या मोटर काढतांना कुठलीही दुर्घटना/अपघात/जीवितहानी झाल्यास हे कार्यालय किंवा कोणताही कर्मचारी/अधिकारी किंवा विद्यापीठ जवाबदार राहणार नाही. याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित निविदाधारक/कंत्राटदाराची राहील.
४. विभागावर देण्यात आलेले काम पूर्ण करण्यात यावे, कामाबाबत विभागावरून तक्रार आल्यास किंवा काम अर्धवट राहील्यास सदर कामाचे देयक काढण्यात येणार नाही.
५. विद्यापीठ प्रशासनाने वेळोवेळी निर्देशित केलेल्या नियमांचे पालन करणे संबंधित निविदाधारकांना बंधनकारक राहील.
६. निविदाधारक/कंत्राटदारांनी देयक सादर करतेवेळी बँक खाते बाबतची संपूर्ण माहिती सादर करावी, अन्यथा देयक अदा केले जाणार नाही.
७. या कार्यालयातर्फे निविदाधारकास बोरवेल मधील फसलेल्या मोटर काढण्याकरिता मनुष्यबळ पुरविण्यात येणार नाही.
८. निविदाधारक/कंत्राटदारास कामाचे देयक काम पूर्ण व विहित वेळेत पूर्ण केल्यावर तसेच संबंधित विभागाचे प्रभारी अधिकारी यांनी काम समाधानकारक झाल्याचे प्रमाणित केल्यानंतरच कामाचे देयक पारित करण्यात येईल.
९. प्रक्षेत्रावरील बोरवेल मधील फसलेल्या मोटर काढत असतांना कोणताही वाद विवाद निर्माण झाल्यास सदर वाद विवाद विद्यापीठ विधी विभागाचे अधिकारी/ मा. संशोधन संचालक, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचे समक्ष मिटविला जाईल व अंतिम निर्णय मा. संशोधन संचालक, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचा राहील आणि तो सर्वांना मान्य करणे बंधनकारक राहील.
१०. निविदेतील कामाचे दर एक वर्षा करिता वैध राहतील.
११. वरीलप्रमाणे अटी व शर्तीस अधीन राहून सोबत जोडलेल्या निविदा मसुदा तपशिला नुसार दि. **१२.०६.२०२६** रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत निविदा सीलबंद लीफाफामध्ये सादर करावी.

**संचालक**
**मध्यवर्ती संशोधन केंद्र**
**डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला**

# निविदा (कोटेशन) मसुदा

मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला अंतर्गत मध्यवर्ती संशोधन केंद्र अंतर्गत विविध विभागाच्या प्रक्षेत्र येथील बोरवेल मधील जि.आय.पाईप तुटून गाळात फसलेले समर्सिब्ल मोटर पंप काढण्याकरिता दर खालील प्रमाणे आहेत.

| **कामाचा तपशील** | **दर (रु.)** |
|---|---|
| विविध विभागाच्या प्रक्षेत्र येथील बोरवेल मधील जि.आय.पाईप तुटून गाळात फसलेले समर्सिब्ल मोटर पंप काढणे | प्रति मोटार पंप |

निविदा सुचनेमधील संपूर्ण अटी व शर्ती मला सर्वस्वी मान्य आहेत.

**ठिकाण:** **स्वाक्षरी**

**दिनांक:** नाव व संपूर्ण